# प्रकरण पहिले

## - प्रास्ताविक व सारेखा -

### शेती व समाज याचे संबंध :-

क्षेत्र या शब्दावरून " शेत " हा शब्द तयार झाला. त्याचा व्यावसाईक अर्थाने शेती असा वापर व्यवहारा मध्ये केला जातो. " क्षेत्र " हा शब्द प्रामुख्याने जमनीचे आकारमान या अर्थाने वापरला जातो. जमीनीचा विशिष्ट भाग निश्चित करून तो कसायला सुरूवात झाल्यानंतरच क्षेत्र किंवा शेत हा शब्द तयार झाला. मर्यादित किंवा विशिष्ट भूभाग या अर्थानेच शेत किंवा क्षेत्र हा शब्द व्यवहारा मध्ये रूढ झाला. त्या सर्वाचा एकत्रित विचार करून व्यवसायासाठी शेती हा शब्द वापरण्यात येतो.

शेती हा व्यवसाय आणि मानवी समाज यांचा परस्पर अत्यंत निकट संबंध आहे. इतका निकट संबंध की परस्परा मुळे परस्परांना अस्तित्व प्राप्त झाले हे विधान ही अतिशयोक्तीचे नाही मानव प्राणी भटक्या नैसर्गीक आवस्थेचे जिवन जगत होता प्राणी पातळीवरील या अवस्थेत शिकार व संचय करून जे प्राणीजन्य आणि वनस्पतीजन्य पदार्थ प्राप्त होतील त्याच्यावर गुजरान करीत होता. प्राण्याच्या भटक्या अवस्थेत मानव होता. तेंव्हा त्याचा समाज निश्चितच निर्माण झालेला नव्हता. भटक्या अवस्थेच्या मर्यादा मानवला जाणवू लागल्या. साधाही तर शिकार नाही तर भिकार ही आवस्था

त्याला अनुभवाने पटू लागली वनस्पतीजन्य पदार्थ देखील हंगामी स्वरूपात मिळतात. त्याचीही शाश्वती देता येत नाही. हे लक्षात आले पोट रिकामे राहू लागल्याने मानवाला विकासाचा मार्ग दाखवू लागले. प्राणीजन्य पदार्थ हमखास मिळविण्यासाठी जनावरे माणसाळणे किंवा पाळणे सुरू झाले. बिया, साले, पाने, खोडे, मुळे जे कांही असेल ते वनस्पतीजन्य पदार्थ उपजिवीकेसाठी आवश्यक असतात. त्यांची निर्मीती स्वतः करण्याची व गरजे प्रमाणे त्यांचा वापर करण्याची कल्पना मानवाला सुचली. यातूनच शेती हा व्यवसाय सुरू झाला.

संचय करणे आणि शिकार करणे यासाठी भटकले तरी चालते. किंबहुना भटकावेच लागते. पण जनावरे पाळणे किंवा शेती कसण्यासाठी एकाच ठिकाणी स्थीर रहावे लागते. म्हणून शेती करणारे मानव एकत्र राहू लागले. त्यांनी स्थिर स्वरूपाच्या वस्त्या उभारायला सुरूवात केली. गुहेतून बाहेर येवून स्वतःचा निवारा उभारू लागले. या मानवी टोळ्यांच्या एकत्र राहण्यातूनच मानवी समाजाची निर्मीती झाली. याचाच अर्थ शेती व्यवसायाने भटकणाऱ्या मानव प्राण्याला एकत्र आणले स्थिर व संघटीत करून त्याचा समाज निर्माण केला अशा रीतीने मानवी प्राण्याचे सुसंघटित समूहात रूपांतर झाले. शेती करणे शक्य झाले म्हणजे शेती व्यवसायाची निर्मीती झाली आणि शेती व्यवसायाची सुरूवात झाल्यामुळे मानवी समाजाची निर्मीती झाली असे शेती व्यवसाय आणि मानवी समाज यांच्या निर्मीतीचे नाते परस्परावलंबी स्वरूपाचे आहे.

शेती व्यवसायाला इंग्रजी मध्ये Agriculture असा शब्द आहे. Agri अधिक culture या दोन शब्दा पासून हा शब्द तयार झालेला आहे. याचाच अर्थ शेती हा केवळ व्यवसाय नाही ती एक संस्कृती आहे. मानवी समाजाच्या निर्मीती पासूनच मानवी संसकृतीची सुरुवात झाली. मानवीसमाज, मानवी संस्कृती यांची निर्मीती शेती या व्यवसायातुनच झाली म्हणूनच शेती हा इतर व्यवसाया सारखा साधा व्यवसाय नव्हे. ती संस्कृती आहे. या बद्दल कोणालाही दुमत दाखविता येत नाही. समाजाच्या समाजशास्त्रीय अभ्यासा मध्ये शेती व्यवसायाला व व्यावसाईकांना अनन्य साधारण महत्व प्राप्त होण्याचे हे महत्वाचे कारण आहे. भारता सारख्या अविकसित किंवा अर्ध विकसित शेती प्रधान व समाज रचने मध्ये तर शेती व्यवसाय आणि व्यावसायीक यांच्या अभ्यासाला अतुलनीय महत्व प्राप्त झालेले आहे. शेती हा भारतीय समाजाने केवळ व्यवसाय म्हणून नव्हे तर जीवन पध्दती म्हणून स्वीकारलेला आहे. भारतीय संस्कृती म्हणून मानलेला आहे.

## भारतीय श्रीमकांची व्यवसायानुसार विभागणी :-

शेती हा बहुसंख्य भारतीयांचा प्रमुख व्यवसाय आहे. सुमारे सात लाख खेड्यातील वाड्यावसत्यातून शेती क्षेत्रातील श्रमिक किंवा शेतकरी पसरलेले आहेत. म्हणूनच भारत हा शेती प्रधान देश मानला जातो. श्रीमकांच्या व्यावसायीक विभागणीचे तीन भाग पाडले जातीत.

[१] प्राथमिक क्षेत्रातील श्रमिक :-

या मध्ये शेती करणारे गुरे पाळणारे मच्छिमारी करणारे जंगल कामामध्ये गुंतलेले श्रमिक समाविष्ट केले जातात.

[२] व्दितीय क्षेत्रातील श्रमिक :-

या क्षेत्रा मध्ये बांधकाम करणारे मोठ्या उद्योगातून काम करणारे खानी मधून काम करणारे दारगुत्ती उद्योगातून काम करणारे श्रमिक समाविष्ट केले जातात.

[३] तृतीय क्षेत्रातील श्रमिक :-

या क्षेत्रा मध्ये व्यापारा मध्ये गुंतलेले वाहतूक क्षेत्रात काम करणारे दळणवळणाच्या व्यवसायात काम करणारे किंवा वाहतूक व्यवसायात गुंतलेले, विमा व्यवसाय, बँन्किंग व्यवसाय, इतर वित्तीय संस्थातून काम करणारे सार्वजनिक, खाजगी आणि सहकारी स्वरूपाच्या प्रशासकीय सेवे मध्ये असणारे श्रमिक समाविष्ट केले जातात.

१९८१ च्या आकडेवारीनुसार भारतीय श्रमिकांची संख्या सुमारे २५ कोटीच्या दरम्याने होती. त्या पैकी सुमारे १८ कोटी पुरूष व सात कोटी स्त्रिया होत्या. ही श्रमिकांची संख्या वेगवेगळ्या क्षेत्रा मध्ये कशी विभागलेली आहे ते पुढील तक्त्यावरून स्पष्ट होते.

## व्यवसायानुसार विभागणी [ शेकडा वाटा ]

| व्यवसाय | १९०१ | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ |
|---|---|---|---|---|---|
| अ] प्राथमिक क्षेत्र : | | | | | |
| | ७१.८ | ७२.१ | ७२.३ | ७२.१ | ६९.३ |
| १] शेतकरी | ५०.६ | ५०.० | ५२.८ | ४३.३ | ४१.६ |
| २] शेतमजूर | १६.९ | १९.७ | १६.७ | १६.३ | २४.९ |
| ३] इतर | ४.३ | २.४ | २.८ | २.५ | २.९ |
| ब] द्वितीय क्षेत्र [गौण] | १२.६ | १०.६ | ११.७ | ११.२ | १२.९ |
| क] तृतीय क्षेत्र | १५.६ | १७.३ | १६.० | १६.७ | १७.८ |
| एकूण .... | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.१ | १००.०० |

वरील तक्त्यातील आकडेवारीवरून लक्षात येते की, १९०१ ते १९७१ या ७० वर्षांच्या काळात देशातील सुमारे ७२ टक्के श्रमिक प्राथमिक क्षेत्रात म्हणजे शेती आणि शेतीशी संबंधीत क्षेत्रात

संदर्भ : जनगणना १९७१ व टाईम्स ऑफ इंडिया डिरेक्टरी १९८३ आणि वर्ल्ड डेव्हलपमेंट रिपोर्ट १९८३

काम करीत होते. १९८१ साली हे प्रमाण ६९.३ टक्के इतके झाले द्वितीय क्षेत्राचा वाटा १९७१ ते १९८१ या दशकात १.७ टक्के इतका वाढला याचाच अर्थ या काळात मोठ्या उद्योगातील, खाणीतील बांधकाम क्षेत्रातील श्रमिकांमध्ये थोडी वाढ झाली आणि तृतीय क्षेत्रात काम करणारे म्हणजे व्यापार उदीम वाहतूक, शासकीय व निमशासकीय बँकींग व इतर क्षेत्रातील नोकरांची संख्या १.१ टक्केनी वाढली.




भारतीय लोकसंख्येची व्यवसायवार विभागणी

या सर्वांचा अर्थ की, गेल्या ८० वर्षांच्या म्हणजे पाउन शतकाच्या काळात शेती हाच भारतीय समाजाचा व राष्ट्राचा प्रमुख व्यवसाय राहीलेला आहे. आज देशील प्रत्येक १० माणसा पैकी ७ माणसांच्या उपजिवीकेचा व्यवसाय शेती हाच आहे. १९६१ ते १९८१ या २० वर्षांच्या काळात शेतक-याचे प्रमाण घटले पण शेतमजूराचे प्रमाण मात्र वाढले याचाच अर्थ भूमीहीन शेतक-याचे प्रमाण वाढले. हे पुढील आकडेवारीवरून दिसून येते. १९६१ मध्ये एकूण श्रमिकात शेतकरी ५३ टक्के व शेतमजूर १७ टक्के होते. १९८१ मध्ये शेतक-याचे प्रमाण ४१ टक्के पर्यंत खाली आले. आणि शेतमजूराचे प्रमाण २५ टक्के पर्यंत वाढले. स्वतंत्र पणे काम करणा-या श्रमिका मध्ये इतर कोणत्याही क्षेत्रा मध्ये शेतमजूराचे प्रमाण जास्त म्हणजे २५ टक्के आहे. याचाच अर्थ काम करणा-या दर चार माणसा मध्ये एक भारतीय शेतमजूर आहे.

## अभ्यास क्षेत्रातील विभागणी :-

ग्रामीण वृध्दांच्या अभ्यास क्षेत्रातील ज्या १०० मुलाखती घेतल्या त्यातील ६५ लोकांनी आपला मुख्य व्यवसाय शेती म्हणून सांगीतला. मजूरी हा मुख्य व्यवसाय असणारे १८ चाकरी म्हणजे शेतीतील कायमची नोकरी ६ बलूतेदारी म्हणजे शेतीशी संबंधीत किंवा आवश्यक व्यवसाय करणारे ९ तर इतर नोकरी करणारे २ लोक निघाले.

## व्यवसायानुसार वृध्दाचे वर्गीकरण

| अ.नं. | व्यवसाय | संख्या |
|---|---|---|
| [अ] | मुख्य व्यवसाय : | |
| | [१] शेती व्यवसाय | ६५ |
| | [२] मजूरी | १८ |
| | [३] नोकरी | २ |
| | [४] चाकरी | ६ |
| | [५] बलूतेदारी | ९ |
| | एकूण .... | १०० |

ज्या लोकांनी मुख्य व्यवसाय शेती किंवा तत्सम व्यवसाय सांगीतले त्यांनी दुय्यम व्यवसाय म्हणून सांगीतलेली माहिती अशी :-

दुग्ध व्यवसाय ५७ टक्के, कुक्कुट पालन ३३ टक्के, विणणे ५ टक्के, कातणे २ टक्के, इतर ३ टक्के याचा अर्थ दुय्यम व्यवसायाचे ह स्वरूप देखील शेती व्यवसायासी संबंधीत असेच आहेत.

## व्यवसायानुसार वृध्दांचे वर्गीकरण

| क्र.नं. | व्यवसाय | संख्या |
|---|---|---|
| [ब] | दुय्यम व्यवसाय : | |
| | [१] कुक्कुट पालन | ३३ |
| | [२] दुग्ध व्यवसाय | ५७ |
| | [३] कातणे | २ |
| | [४] विणणे | ५ |
| | [५] इतर | ३ |
| | एकूण .... | १०० |

केवळ अभ्यास क्षेत्रा पुरतेच नव्हे तर संपूर्ण भारतीय समाजाचा किंवा अर्थ व्यवस्थेचा कणा म्हणून शेती व्यवसाय महत्वाचा आहे. केवळ एका शेतमालाची निर्यात एकूण निर्यातीत ७५ टक्केच्या दरम्यान असते. इतर सर्व व्यवसायातील वस्तूंची निर्यात ५५ टक्के असते.

खा-या [वास्तव] संपत्ती निर्मीतीचा व्यवसाय :-

संपत्ती निर्मीतीच्या दृष्टीने विचार केला तर खारी संपत्ती निर्मीती केवळ शेती व्यवसायातच होते. असे आपणास मान्य करावे लागेल एखादे बी पेरल्या नंतर त्या पासून हजारो बिया तयार होतात. ते फक्त शेती मध्येच! इतर कोणत्याही व्यवसाया मध्ये कच्या माला पेक्षा उत्पादित माल जादा नसतो. किंबहूना इतर सर्व व्यवसाय शेती मध्ये निर्माण झालेल्या वस्तूंचा रंग, रूप, आकार बदलन्याची प्रक्रिया करतक असतात. लोखंडाची यंत्रे, लाकडाच्या वस्तू, कापडाची निर्मीती इतकेच नव्हे तर कारखान्यातून निर्माण होणा-या वस्तू खा-या अर्थाने निर्माण केल्या जात नांहीत. तर त्यावर केवळ प्रक्रिया केली जाते. खारी संपत्ती निर्मीती शेती या एकाच व्यवसायातून होते. म्हणून मानवी समाजात शेतीला पर्यायाने जमीनीला असाधारण महत्व असते. म्हणूनच शेतकरी समाजाचा अभ्यासही काळाची गरज आहे.

मातृतुल्य पण उपेक्षित व्यवसाय :-

अशा मातृतुल्य व्यवसायाचा व व्यावसायीकांचा अभ्यास भारता मध्ये व्हावा तितक्या प्रमाणात व अपेक्षे प्रमाणे होत नांही इतर सर्व व्यवसायांचा व व्यावसायीकांचा सर्वत्र अभ्यास केला जातो; पण या मूलभूत व्यवसायाचा व व्यावसायीक समाजाचा ह खा-या अर्थाने अभ्यास होत नांही. ही खांत मनाला बोचत असल्या मुळे हा अभ्यास या संशोधनाच्या रूपाने करण्याचा हा एक छोटासा प्रयत्न शेतकरी समाजाचा तांत्रिक पध्दतीने अभ्यास करणे हा या संशोधनाचा हेतू नांही. किंबहूना समाजशास्त्राच्या अभ्यासकाचा तो विषय ही नव्हे.

शेती क्षेत्रातील शास्त्रज्ञांच्या अभ्यास करीतील तो विषय आहे. समाजशास्त्राचा अभ्यासक म्हणून भारतीय समाजाचा महत्वाचा घटक असलेल्या शेतकरी समाजाचा अभ्यास करणे हा या संशोधनाचा उद्देश आहे.

## उपेक्षीत वृध्द - समाज :-

शेतकरी समाजाचा अभ्यास करीत असतांना देशील भारतातील सर्व शेतकऱ्यांचा सर्वांगीन अभ्यास असे या अभ्यासाचे स्वरूप नांही. " समाजातील वृध्द शेतकरी " असे या अभ्यासाचे स्वरूप मर्यादित आहे. वृध्द शेतकरी जो आयुष्यभर काबाडकष्ट करून थकलेला असतो रानावनातून उन्हातान्हातून रात्रंदिवस राबून ज्याची गात्रे गलित झालेली असतात इतरांची भूक भागावी म्हणून धारणी मातेला पान्हा फोडण्यासाठी प्रसंगी अर्धपोटी राहून तो झिजत आलेला असतो. त्याच्या आयुष्याचा शेवटाच्या परावलंबित्वाच्या काळाचा कोणीही विचार केलेला नसतो.

त्याची उपयुक्तता संपत आलेली असल्यानेही त्याची सर्वजन उपेक्षा करतात इतरांच्या जीवनाला सर्व प्रकारची सुरक्षितता निर्माण व्हावी म्हणून संपूर्ण आयुष्य वेचलेला पण शेवटच्या कालखंडात सर्वस्वी असुरक्षित बनलेल्या भारतीय शेतकऱ्यातील या महत्वाच्या घटकाची अभ्यास विषय म्हणून निवड केलेली आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## हरित क्रांती आणि कोल्हापूर जिल्हा

७० टक्के भारतातील कोठ्यावधी वृध्द शेतक-यांचा एकत्रीत अभ्यास अशक्यप्राय आहे. म्हणून वृध्द शेतक-यांच्या या अभ्यासाला गडहिंग्लज तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या मर्यादा घालाव्या लागल्या एका तालुक्यावरुन संपूर्ण भारताचीच पूरेपूर कल्पना येईल. असा ही दावा या मर्यादित संशोधनावरुन करता येत नांही. पण निदान या तालूक्यावरुन भारतीय समाजाचा प्रकार अंशत: कळायला मदत निश्चित होईल. गडहिंग्लज तालूकाच यासाठी निश्चित केला त्यालाही कांही कारणे आहेत. पहिले म्हणाजे गडहिंग्लज जिल्हा कोल्हापूर हा तालूका वृध्द शेतक-यांच्या समाज शास्त्रीय अभ्यासाला उत्तम प्रतिनिधीक नमूनेदार उदाहरण आहे असे वाटते. कोल्हापूर हा जिल्हा भारतातील एक प्रगत जिल्हा किंवा प्रगतीची वेगाने वाटचाल करीत असलेला जिल्हा मानला जातो. कोल्हापूरातील सर्वांगीन प्रगतीचा पाया हा या जिल्ह्यातील शेती व्यवसायाच्या प्रगती मधून घातला गेलेला आहे.

कोल्हापूर जिल्ह्याच्या शेती विकासा मध्ये पंजाब,हरियाणा सारख्या नैसर्गीक देणग्याचा वाटा फार कमी आहे. किंबहूना नैसर्गीक अनुकूलता नांहीच कोल्हापूरच्या शेतक-या मधील धामक, कल्पकता कष्टाची तयारी जिदद् या मुळे घाट माथ्यावरील तसा डोंगराळ व धाडकाळ जिल्ह्याला भारतात अग्रेसर बनविण्याचे काम कोल्हापूरच्या शेतक-यांनी विशेषत: पाठीमागच्या पिढीतील शेतक-यांनी म्हणाजे

आजच्या व कालच्या वृध्द शेतक-यांनी केलेले आहे म्हणून कोल्हापूरचा कालचा आणि आजचा वृध्द शेतकरी हा समाज शास्त्रीय अभ्यासाचा एक आव्हानात्मक विषय आहे या छोट्या संशोधनात ते आव्हान पेलनेचा प्रयत्न आहे.

गडहिंग्लज तालुका एक प्रतिनिधीक नमुना :-

गडहिंग्लज तालुक्याची निवड करण्या मध्ये ही विशिष्ट कारण आहे. हरितक्रांती प्रथम कोल्हापूरच्या आसपास अवतरली आणि आता ती गडहिंग्लज भुदरगड चंदगड आजरा शाहूवाडी वगैरे कोल्हापूर शहरापासून दूर असलेल्या तालुक्यांच्या मध्ये पसरू लागलेली आहे. शेतीचे आधुनीकरण आणि इतर क्षेत्रातील औद्योगिकरण आता हळू हळू या तालुक्या मध्ये पसरू लागलेली आहे. एका अर्थाने भारतीय समाज जसा विकासाच्या दृष्टीने वाटचाल करू लागलेला आहे. विकसनशील मानला जातो. तशाच अर्थाने गडहिंग्लज तालुकाही शेती व्यवसायाच्या दृष्टीने आज विकसनशील आवस्थेतून वाटचाल करू लागलेला आहे. व्यावसायीक बदल सामाजिक बदल घडवून आणीत असतात. कार्लमार्क्सने म्हटलेले आहेच की " भौतिक उत्पादनाची साधने सामाजिक संबंध निश्चित करीत असता सामाजिक संबंध कसे कसे बदलत जातात हे औद्योगिक क्रांतीने सिध्द करुन दाखविलेले आहे " x गडहिंग्लज तालुक्यातील शेती आणि शेतकरी आता बदलू लागलेला आहे. या नव्या जुन्याच्या सीमा रेषेवरुन गडहिंग्लज तालुक्यातील शेती व शेतक-यांचा चाललेला प्रवाह हा एका अर्थाने विकसनशील भारतीय समाजाचा नमुना आहे.

---

x संदर्भ :- भांडवल [ दास कॅपिटल ] लेखक कार्ल मार्क्स

म्हणूनच वृध्द शेतक-यांच्या अभ्यासासाठी गडहिंग्लज तालूका निश्चित करुन " गडहिंग्लज तालूक्यातील वृध्द शेतक-यांचा समाजशास्त्रीय अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निश्चित केलेला आहे. या संशोधना साठी आपघाती मुलाखत पध्दतीचा वापर केलेला आहे. नावे निश्चित करतांना कोणतेही निकष ठरविलेले नव्हते. अभ्यासाच्या प्रक्रियेत जे १०० लोक भेटले त्यांच्या मुलाखती घेतल्या गावे देखील प्रथम निश्चित केलेले नांहीत. गडहिंग्लज तालूक्यातील या गावा मध्ये जावून जे भेटतील त्यातील बोलक्या व्यक्तींच्या भेटी घेवून त्यांच्या मुलाखती व्दारे माहिती मिळवायच्याच प्रयत्न केलेला आहे. अभ्यास पूर्ण करण्यासाठी अभ्यासकाल हीच पध्दती योग्य वाटली.

अभ्यास विषयाची मांडणी :-

हा अभ्यास विषय दहा प्रकरणा मध्ये मांडलेला आहे. मांडणीचे स्वरुप थोडक्यात खालील प्रमाणे आहे

[१] पहिल्या प्रकरणा मध्ये शेती व शेतकरी याचे भारतीय समाज रचनेतील महत्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मानवी समाजाच्या निर्मीतीशी शेती व्यवसायाचा असलेला घनिष्ठ संबंध केलेला असून शेतकरी समाजाच्या अभ्यासाचे महत्व तांबीतलेले आहे. शेती व शेतक-यांच्या अभ्यासाचे महत्व मान्य

करून वृध्द शेतकऱ्यांचीच अभ्यासासाठी का निवड केली याचाही खुलासा या प्रकरणा मध्ये आहे. गडहिंग्लज तालुका प्रतिनिधीक किंवा नमुना म्हणून का निवड केली याचा ही उहापोह पहिल्या प्रकरणा मध्ये करण्यात आलेला आहे.

[२] दुसरे प्रकरण व्याख्येच्या स्वरूपात आहे. पहिल्याने शेतकऱ्यांची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. केलेल्या व्याख्येनुसार शेतकऱ्याचे कोणते आणि किती प्रकार आहेत संशोधकाला आढळून आले याचेही स्पष्टीकरण सदर प्रकरणा मध्ये दिलेले आहे.या प्रकरणा मध्ये शेतकऱ्या प्रमाणे वृध्द शेतकऱ्यांची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. वयोमान व क शारीरीक आवस्थेचा सारासार विचार करून सदर व्याख्या तयार करण्यात आला आहे

[३] तिसऱ्या प्रकरणा मध्ये वृध्द शेतकऱ्यांच्या आर्थिक आवस्थेचा अभ्यास केलेला आहे. वृध्द शेतकरी आर्थिक दृष्ट्या का व कसा परावलंबी होतो त्यामुळे त्याला वृध्दापकाळी कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते याची चर्चा या प्रकरणा मध्ये केली आहे.

[४] चौथे प्रकरण हे वृध्द शेतकऱ्यांची व शेतकरी वृध्दांची मानसिक आवस्था स्पष्ट करणारा आहे. आयुष्याचा शेवटच्या पर्वातून

प्रवासकरणाऱ्या शेतकरी वृध्दांची मानसिक अस्वस्थतात आवस्था किंवा कोंडमारा याचे स्पष्टीकरण सदर प्रकरणा मध्ये करण्यात आलेले आहे.

[५] पाचव्या प्रकरणा मध्ये शेतकऱ्यांच्यासाठी भविष्य निर्वाह निधीची योजना आहे. इतर शेतकऱ्यांच्यासाठी भविष्य निर्वाह निधीची योजना असा आहे इतर क्षेत्रातील श्रमिका प्रमाणे किंवा सरकार नोकरांच्या प्रमाणे वर्गणी सहीत भविष्य निर्वाह निधी कसादेता येईल आणि देणे शक्य व आवश्यक आहे याची चर्चा केलेली आहे.

[६] सहाव्या प्रकरणा मध्ये वृध्दाश्रमाची कल्पना मांडलेली आहे. नागरी समाजातून जसे वृध्दाश्रम निघात आहेत तसे वृध्दाश्रम काढण्याची गरज आता नागरी समाजातून ही का व कशी निर्माण झालेली आहे. याची चर्चा करून या वृध्दाश्रमाचे स्वरूप कसे असावे याची चर्चा या प्रकरणा मध्ये करण्यात आलेली आहे.

[७] सातव्या प्रकरणा मध्ये वृध्द शेतकऱ्यासाठी निवृत्ती वेतन योजना का व कशी अंमलात आणता येईल याचा विचार मांडलेला आहे.

[८] आठव्या प्रकरणा पासून प्रबंधाचा तिसरा टप्पा सुरु होतो संशोधकाच्या एक भाग म्हणून शेतकरी समाजातील प्रतिनिधीक स्वरुपाची उदाहरणे घेतलेली आहेत. त्या पैकी बागायतदार सुखवस्तू व प्रतिष्ठीत समजल्या जाणा-या शेतक-याचे शब्दचित्र या प्रकरणा मध्ये रेखाटले आहे. सदर व्यक्ती व घटना संपूर्ण सत्य असल्या तरी हा शोध निबंध असल्याने त्या व्यक्तीचे प्रत्यक्ष नांव न घालता त्यांला "क्ष" हे नांव कल्पीलेले आहे ✓

[९] या प्रकरणा मध्ये भूमीहीन शेत मजूराचे शब्द चित्र आहे यातील सर्व घटना आणि दुर्घटना १००टक्के सत्य असूनही प्रबंधा मध्ये त्याचेही नांव क्ष असेच ठेवलेले आहे. या क्ष ची शोकांतीका संशोधन काळातच घडलेली आहे. ✓

[१०] दहाव्या प्रकणा मध्ये शेतकरी वृध्द स्त्रीचे शब्दचित्र आहे भारतातील अशा कोठ्यावधी शेतकरी स्त्रीचा घरगुत्ती गुलाम गरिबीचे व दुय्यम नागरीकत्वाचे जीवन जगत आहे. स्थळकाळाच्या मर्यादा जाणून ही चर्चा अगदी त्रोटक स्वरुपात केलेली आहे.

[११] ११ वे प्रकरण समारोपाचे असून त्या मध्ये संशोधक क्षेत्रातील गांवे संदर्भ ग्रंथ याची सूची जोडून प्रबंधाचा समारोप केलेला आहे.